Jyoti/Marathi Letter

# मुंबई विद्यापीठ

क. युजी/२७९/२०१७-१८

...GE COLLEGE
INWARD NO. 9834
DATE 7.11.17

## परिपत्रक :-

विषय :- **जुन्या अभ्यासक्रमानुसार परिक्षा देण्याकरता शेवटची अतिरिक्त संधी देण्याबाबत.**

संदर्भ :- १) Circular No. UG/109 of 2015, dated 16th October, 2015,
२) परिपत्रक क.युजी/१४२/२०१६, दि. २ मार्च, २०१६,
३) परिपत्रक क. युजी/३७/२०१६, दि. १ ऑगस्ट, २०१६,
४) परिपत्रक क. UG/२५४/२०१६-१७, दि. १० मार्च, २०१७,
५) परिपत्रक क. UG/२५५/२०१६-१७, दि. १४ मार्च, २०१७,

मुंबई विद्यापीठ विभागांचे संचालक/विभागप्रमुख, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांना असे सुचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाचे उपरोक्त परिपत्रकांनुसार एप्रिल/मे, २०१७ च्या परिक्षेपर्यत प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष आणि तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची संधी देण्यात आली होती. तद्अनुषंगाने सदर बाब पुन:श्च विद्वत परिषदेच्या दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आली, खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**बाब क.** ७:१ "असा ठराव करण्यात आला की, अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार परिपत्रक क. UG/२५४/२०१६-१७, दिनांक १० मार्च, २०१७ च्या अनुषंगाने जे विद्यार्थी व बंद झालेल्या जुन्या अभ्यासक्रमातील कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष किंवा तृतीय वर्षाच्या परीक्षेस बसुन, अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना ते ज्या-ज्या विषयात अनुत्तीर्ण झालेले असतील त्या विषयांच्या परीक्षेस प्रविष्ठ होण्याची शेवटची संधी देण्यात यावी. यासाठी त्या-त्या विषयांच्या अधिष्ठात्यांनी त्यांच्या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांची तत्कालीन व नव्या अभ्यासक्रमाशी तुलना करुन समतुल्यता ठरवावी व त्यानुसार विद्यार्थ्यांना त्यांनी उत्तीर्ण केलेल्या विषयांची सूट देण्यात यावी. त्यानंतर असाही ठराव करण्यात आला की, उर्वरित अनुत्तीर्ण विषय व सूट न मिळालेल्या विषयांची परीक्षा देण्यासाठी सदर विद्यार्थ्यांना नोव्हेंबर-डिसेंबर, २०१७ व एप्रिल-मे, २०१८ च्या परीक्षेस बसण्याची मुभा देण्यात यावी, तसेच, सदर विद्यार्थ्यांसाठी एप्रिल-मे, २०१८ च्या परीक्षेला बसण्याची शेवटची संधी असेल."

सदर परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आंहे.

(डॉ. दिनेश फ. कांबळे)
प्रभारी कुलसचिव

दि. २७ ऑक्टोबर, २०१७